Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 21 January 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक २१ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता**

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दावोस इथं आयोजित जागतिक आर्थिक मंच शिखर परिषदेत जर्मनी, ब्राझील, फ्रान्स, बर्मुडा, गॅबॉन, यूएई आणि आफ्रिकी संघाच्या नेत्यांसोबत विविध विषयांवर महत्त्वपूर्ण संवाद साधला. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधेचं यश हे व्याप्तीवर अवलंबून होतं, तर पुढील युग हे विश्वासावर आधारित असेल, असं मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्र राज्य कृत्रिम बुद्धिमत्ता-सहाय्यित प्रशासन, भविष्यवेधी सेवा वितरण आणि नागरिक-केंद्रित उत्तरदायित्व प्रणालींचं अवलंबन करून या नव्या बदलाचं नेतृत्व करत आहे, असंही ते म्हणाले. या भविष्यवेधी प्रणालींसाठी महाराष्ट्र राज्यासोबत सहकार्य करण्यासाठी जागतिक नेत्यांना मुख्यमंत्र्यांनी आमंत्रित केलं.

****

लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याअंतर्गत केंद्र सरकारी कर्मचारी किंवा अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलिसांना सीबीआयकडून पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता नाही, असा निर्वाळा, सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. केवळ कारवाईच्या सुलभतेसाठी वेगवेगळ्या केंद्रीय आणि राज्यस्तरीय यंत्रणा वेगळ्या स्तरावर काम करत असतात, मात्र राज्यस्तरीय यंत्रणांना केंद्र सरकारी अधिकाऱ्याची चौकशी करता येईल आणि आरोपपत्रही दाखल करता येईल, असा निर्णय राजस्थान उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला होता, तो सर्वोच्च न्यायालयानं कायम ठेवला आहे.

****

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपत आहे. उद्या २२ तारखेला अर्जांची छाननी होईल तर, २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. त्याच दिवशी अंतिम उमेदवार यादी आणि चिन्ह वाटप करण्यात येईल. पाच फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषदेसाठी एक आणि पंचायत समितीसाठी एक अशी दोन मतं द्यावी लागणार आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ६३ जिल्हा परिषद गट आणि १२६ पंचायत समित्यांसाठी होत असलेल्या निवडणुकीसाठी आतापर्यं ३४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून, एक हजार ३२६ अर्जांची विक्री झाली आहे.

****

राज्यातल्या नद्यांना प्रदूषणाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी राज्य सरकारने ऐतिहासिक पुढाकार घेत `राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण` स्थापन करण्याची महत्त्वपूर्ण संकल्पना मांडली होती. राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी नवी दिल्लीत केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची भेट घेऊन या प्रस्तावाचं सादरीकरण केलं. या प्राधिकरणास मंजुरी मिळाल्यास ते देशातलं पहिलं प्राधिकरण ठरणार असल्याचं मुंडे यांनी सांगितलं. राज्यातल्या जल आणि पर्यावरण प्रकल्पांच्या सद्य:स्थितीवर यावेळी सविस्तर चर्चा केली.

****

पुण्यात आयोजित 'पीएम सेतू' कार्यक्रमाचा काल समारोप झाला. शाश्वत प्रगतीसाठी तसंच प्रशिक्षकांचं कौशल्य सतत अद्ययावत ठेवण्यासाठी उद्योगांनी सहकार्य करावं, असं आवाहन केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देबाश्री मुखर्जी यांनी यावेळी केलं. आयटीआय संस्थांचं आधुनिकीकरण केवळ पायाभूत सुविधांपुरतं मर्यादित न ठेवता, प्रशिक्षणाची गुणवत्ता आणि रोजगारक्षमता वाढवण्यावर भर देणं गरजेचं आहे असं त्या म्हणाल्या. यावेळी मुखर्जी यांनी ४० हून अधिक आघाडीच्या कंपन्यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला.

****

आंतरराष्ट्रीय स्तराच्या 'पुणे ग्रँड टूर' या सायकलिंग मुख्य स्पर्धेचा पूर्वरंग असलेली प्रोलॉग स्पर्धा झाल्यानंतर काल पहिल्या टप्प्यात हिंजवडी ते आकुर्डी या मार्गावर चीनच्या ली निंग स्टार संघाच्या ल्यूक मडग्वे यानं दमदार कामगिरी करत निर्विवाद वर्चस्व गाजवलं. भारतीय राष्ट्रीय संघाच्या हर्षवीर सिंग सेखॉन सर्वोत्तम भारतीय सायकलपटू ठरला. माजी लष्कर प्रमुख मनोज पांडे, पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, अभिनेते नाना पाटेकर, यांच्या हस्ते स्पर्धेचा आरंभ करण्यात आला.

मराठा हेरिटेज सर्किट नावानं शर्यतीचा दुसरा टप्पा आज पुण्याच्या कॅम्प परिसरातून सुरु होत आहे. १०५ किलोमीटरच्या या मार्गात पुरंदर किल्ला, सिंहगड आणि खडकवासला धरणाचा परिसर आहे. यात एक हजार ५१ मीटरची चढण पार करताना सायकलपटूंच्या कौशल्याची कसोटी लागेल.

****

सांगलीतील द्राक्ष आणि बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी काल मोर्चा काढला. परदेशातून आयात होणाऱ्या बेदाण्यावर आयात शुल्क आकारावं, बेदाण्यास आर्थिक स्थैर्य मिळण्यासाठी मंडळाची निर्मिती केंद्र सरकारनं करावी, तसंच बेदाण्याचा शालेय पोषण आहारात समावेश करावा अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

****

पालघर जिल्ह्यात होणारे वाढवण बंदर आणि जिंदाल बंदर रद्द करावे, प्रलंबित वनपट्टे धारकाच्या नावावर करावेत, स्मार्ट मीटरची सक्ती रद्द करावी आणि अन्य १२ मागण्यांसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे काढण्यात आलेला लॉन्ग मार्च काल पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर नेण्यात आला. मोर्चेकऱ्यांतर्फे याठिकाणी ठिय्या आंदोलन करण्यात आलं.

****

राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य विधिज्ञ गोरक्ष लोखंडे आजपासून तीन दिवस लातूर जिल्ह्याच्या दौरा करणार आहेत. या दौऱ्यात ते जिल्ह्यातल्या विविध नगरपरिषदांमध्ये राबवण्यात येणाऱ्या योजनांचा सविस्तर आढावा घेणार आहेत.

****